पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रिय कार्यालय, भोसरी-२६
जा.क्र.कक्षेका/स्वीस/१०१/२०१९
दि. २९/०६/२०१९

प्रति,

सदस्य/सदस्या क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नेहरुनगर,भोसरी-२६.

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. ०३/०७ /२०१९ रोजी आयोजित केलेबाबत.**

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. ०३/०७/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग समिती
**कार्यपत्रिका क्रमांक- २६**

दिनांक- ०३/०७/२०१९ वेळ- दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ०३/०७/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

विषय क्रमांक १ : मा.क्षेत्रीय अधिकारी, क क्षेत्रीय कार्यालय यांचे पत्र इक्षेका/प्रशा/४/कावि/३/२०१९ दिनांक २८/०६/२०१९

मनपाच्या सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्र तयार करीत असतांना मा. क्षेत्रीय अधिकारी यांचे वाहन इंधन (अधिकारी) या लेखाशिर्षामध्ये र.रु. १,१५,०००/- तरतुद करणेत आलेली आहे. सदर तरतुद मधुन सन २०१८-१९ ची वाहन इंधनाची बिले खर्ची टाकणेत आलेली आहेत. त्यामुळे माहे जून २०१९ अखेर र.रू.६,६४४/- शिल्लक असून सदरची तरतुद कमी पडणार आहे. त्याकरिता सार्वजनिक वाचनालय वृत्तपत्रे बिले या लेखाशिर्षावर र.रु.५,७५,०००/- असून त्यापैकी र.रु. १,७५,०००/- तरतुद वाहन इंधन (अधिकारी) या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

मा.सभापती यांचे मान्यतेने घेणेत येणारे ऐनवेळचे विषय

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रिय कार्यालय, भोसरी-२६
जा.क्र.कक्षेका/प्रशा/स्वीस/१०१/२०१९
दि. २९ /०६/२०१९